**शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. जीईसी-२०१०/(१८६/२०१०)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ७ ऑगस्ट, २०१०.

संदर्भ : १) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१०/१९५०, दिनांक २४ जून, २०१०.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक जीईसी २००९/(१५/०९)/तांशि-४, दिनांक २५ जून, २००९.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक जीईसी २००९/(१६/०९)/तांशि-४, दिनांक २५ जून, २००९.

**प्रस्तावना** : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या नियमानुसार ६० टक्के गुण प्राप्त होणा-या पदविका उत्तीर्ण विद्यार्थ्यांना थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात येते. या संदर्भात द्वितीय वर्षाच्या सर्व रिक्त जागा हया सामुहिक प्रवेशाच्या प्रक्रियेमार्फत भरणे आवश्यक असते. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या हितास्तव शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून ज्या संस्था दुस-या वर्षाच्या रिक्त जागा संचालक, तंत्र शिक्षण यांना कळविणार नाहीत, अशा संस्थांविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० मधील कलम १८८ नुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी तरतूद करण्यात आली आहे.

२. परंतु अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने आपले हॅण्डबूक शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सुधारित केले आहे. त्या हॅण्डबूकमध्ये जी संस्था त्यांच्या मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देईल, अशा संस्थांवर दंडनीय कारवाई करण्यासाठी काही तरतूदी विहित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे दुस-या वर्षाच्या जागा संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत केंद्रिभूत प्रवेश पध्दतीने भरल्यास गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिकाधिक लाभ होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र प्रवेशासंदर्भात दिनांक २५ जून २००९ च्या आदेशाचा पुर्नविचार करुन नवीन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या ज्या संस्था थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या जागा संचालक, तंत्रशिक्षण यांना कळविणार नाहीत, अशा संस्थांवर खालीलप्रमाणे कारवाई संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

(अ) शैक्षणिक संस्थेने वरीलप्रमाणे नियमबाह्य कार्यवाही प्रथमच केली असेल अशा वर्षी संचालकांना न कळविलेल्या जागा, गुणिले ५, गुणिले प्रति विद्यार्थी शिक्षण शुल्क याप्रमाणे संस्थांकडून दंड आकारण्यात यावा. तसेच, संचालकांना न कळविलेल्या जागा, गुणिले २ एवढया जागा पुढील वर्षाच्या प्रवेशातून वजा कराव्यात.

(ब) संस्थेने अशा प्रकारची नियमबाह्य कार्यवाहीची पुनरावृत्ती दुस-यांदा केली असल्यास सदर संस्थेबाबत Supernumerary Quotaची मान्यता रद्द करण्याची शिफारस अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस करण्यात यावी. तसेच अशा संस्थेचे एक किंवा अनेक अभ्यासक्रमांचे प्रवेश बंद करण्याची शिफारस अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस करण्यात यावी.

विपि

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
4 SEP 2010
६२५९

(क) संस्थेने अशा प्रकारची नियमबाह्य कार्यवाहीची पुनरावृत्ती तिस-यांदा केली असल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्याची शिफारस अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेला करण्यात यावी. तसेच सदर संस्था विहित नियमांचे पालन करीत नाही म्हणून कसूरदार असल्याचे घोषित करण्यात यावे.

२. वरीलप्रमाणे कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण यांना करावी. अपवादात्मक प्रसंगी प्रकरण शासनास सादर करावे.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, पुणे
कुलसचिव, सर्व विद्यापीठे.


# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

/ फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web.ropune.org.in


**महत्वाचे/**

जा.क्र.विकापु/विवि/थेट व्दितीय वर्ष प्रवेश/२०१०-११/ ८३५८ दिनांक : - 8 SEP 2010

प्रति,
प्राचार्य, सर्व पदवी अभियांत्रिकी, /औषधनिर्माण शास्त्र संस्थाना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्र. सहसंचालक करीता
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री. शिन्दे एस. बी., प्रोग्रॅमर यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.